# वर्धा जिल्ह्यातील १४ रेती घाटाची पर्यावरण विषयक लोकजनसुनावणीचे इतिवृत्त दि.१२/१०/२०२२.

जिल्हा खनिकर्म अधिकारी, खनिकर्म विभाग, जिल्हाधिकारी वर्धा, ता. व जि. वर्धा यांनी वर्धा जिल्हयातील एकुण १४ रेतीघाट वर्धा, वेणा व धाम नदीक्षेत्रात आर्वी तालुक्यातील सालफळ (२.१० हेक्टर), परतोडा-१ (१.० हेक्टर), तालुका हिंगणघाट येथील चिकमोह (३.६० हेक्टर), टेंभा (१.४० हेक्टर), येळी (२.१८ हेक्टर), नांदरा रिठ (१.४० हेक्टर), आजनसरा (१.०५ हेक्टर), सावंगी रिठ (१.०५ हेक्टर), डोरला (१.०५ हेक्टर), धोची (१.१६ हेक्टर), कुरण रिठ (१.०८ हेक्टर), ढिवरी-पिपरी (३.० हेक्टर), साती (१.० हेक्टर), तालुका समुद्रपूर येथील मांडगांव-४ (१.०६ हेक्टर) प्रस्तावित रेतीघाटाची लोकसुनावणी घेण्याबाबत अर्ज प्राप्त झाले. त्यानुसार वर्धा जिल्ह्यातील १४ प्रस्तावित रेतीघाटाची पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक १२/१०/२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता बैठक सभागृह (मिटींग हॉल), जिल्हाधिकारी कार्यालय, वर्धा येथे श्रीमती. अर्चना मोरे, निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्री.अशोक करे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य ऑनलाईन पध्दतीने उपस्थित होते व श्री.आनंद काटोले, उप-प्रादेशिक अधिकारी, नागपूर-२ यांनी समन्वयक म्हणून काम केले. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांच्या नावांची यादी सोबत जोडले आहे. **(सहपत्र-१)**.

## पार्श्वभूमी

मा.जिल्हाधिकारी, वर्धा यांनी रेती/वाळू निर्गमीतीचे धोरण दि. २८/०१/२०२२ नुसार १४ रेती घाट उत्खननासाठी प्रस्तावित केलेले असून जिल्हा खनिकर्म अधिकारी, वर्धा यांना विविध अनुमती घेणेकरिता प्रकल्प प्रवर्तक म्हणून नेमलेले आहे. सदर १४ रेती घाट तालुकास्तरावर मा.तहसिलदार यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीस भुवैज्ञानिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ यांचे प्रतिनिधी, जलसंधारण विभागाचे प्रतिनिधी असलेल्या तालुका तांत्रिक समितीद्वारे ओपन कास्ट पध्दतीने म्हणजेच पारंपारिक पध्दतीने (घमेले, पावडे यांच्या साहाय्याने) उत्खनन करण्याचे प्रस्तावित केलेले आहे.

## प्रयोजन व कार्यपध्दती

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी अध्यक्षांच्या परवानगीने अध्यक्षा, लोकसुनावणीचे समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली.

सर्वप्रथम मा. निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा व अध्यक्षा, जन सुनावणी समिती यांनी जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही असे स्पष्ट केले. या जाहिर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व शासनास पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप घ्यावयाचे असतील तर या ठिकाणी तोंडी मांडावयाचे आहेत त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारीत अधिनियम दि. ०१/१२/२००९ नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक ०९/०९/२०२२ ला दैनिक हितवाद (इंग्रजी) व दैनिक नवराष्ट्र (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आल्या. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. **(सहपत्र-२)**.

..२/-

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी परिसरातील लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले हाते. जाहीर लोकसुनावणीच्या दिवसापर्यंत तक्रार वा आक्षेप म.प्र.नि.मंडळाकडे १ ईमेलद्वारे प्राप्त झाले आहे. तदनुसार, मंडळाचा आदेश क्र. ई-७०/२०२२ पत्र क्र. BO/JD/(WPC)/PH/B-220920FTS0232 dtd. 20/09/2022 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडत आहे. **(सहपत्र-३).**

तद्नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर-२ तथा समन्वयक यांनी प्रकल्पधारकाला प्रकल्पाबद्दल व पर्यावरणीय अहवालाबाबत विस्तृत सादरीकरण करण्यास सांगितले. तदनुसार, प्रकल्प धारकाच्या प्रतिनिधीने तपशिलवार स्थानिक भाषेत वर्धा जिल्ह्यातील १४ रेतीघाटाचे सादरीकरण केले. सादरीकरण झाल्यावर उपस्थित नागरीकांना आपले अभिप्राय, सूचना, आक्षेप नोंदविण्याकरीता आव्हान करण्यात आले. त्यानुसार खालील नमुद नागरीकांनी आपले अभिप्राय व्यक्त केले.

**कार्यवृत्तः-**

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेतः**

**१) श्री.राहुल दौलतकार, गोपापूर, ता.हिंगणघाट, जि.वर्धा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | स्थानिक ग्रामपंचायत हद्दीतील रस्त्याची सुधारणा करावी. | **स्थानिक रस्त्यांचे मजबुतीकरण करण्यात येणार.** |

**२) श्री.राहुल टापसाळ, जि.वर्धा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाहतुक करतांनी GPS प्रणाली यंत्रणा लावावी. | **GPS यंत्रणा लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.** |

**३) श्री. हिरण जाधव, मानगावं, जि.वर्धा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रेती घाटावर कॅमेरे लावण्यात यावे. | **रेती घाटावर कॅमेरे लावणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.** |

**४) श्री. गौतम खरडे**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | वाहतुकीच्या वेळी धुळ नियंत्रणासाठी पाण्याची फवारणी करावी. | **रेती वाहन वाहतुकीच्या वेळेस पाणी फवारणी यंत्रणा कार्यान्वीत करण्यात येणार.** |

**५) श्री. मनोज वाटाणे, क्षेत्र अधिकारी, मप्रनि मंडळ, नागपूर**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | रिप्लेशमेन्ट स्टडी करण्यात आला आहे काय व त्याची माहिती दयावी. | रिप्लेशमेन्ट स्टडी करण्यात आली आहे आणि त्याची माहिती सादरीकरणात दाखवण्यात आलेली आहे. |

वर्धा जिल्ह्यातील १४ प्रस्तावित रेतीघाट करीता जाहिरात/सूचना कालावधीत प्राप्त आक्षेपांची माहिती सोबत जोडण्यात येत आहे. **(सहपत्र-४).**

मा. निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा यांनी सदर प्रकल्पाबाबत उपस्थित नागरिकांना कळविले की, नागरीकांनी मांडलेल्या अभिप्राय व सूचना याची दखल घेण्यात येईल. त्यानंतर उपस्थित केलेल्या प्रश्नांची व प्रकल्प प्रस्तावकांच्या उत्तराची उजळणी करण्यात आली व वर्धा जिल्ह्यातील १४ रेती घाटाबाबत झुमॲपवर उपस्थित जन समुदायाने शांतपणे आपले निवेदने मांडली व उपस्थित केलेल्या मुद्दयांची तंतोतंत इतिवृत्तात नोंद घेण्यात आली, असे कळविले. जन सुनावणी समितीचे अध्यक्षांनी जनसुनावणीचा समारोप केला. समन्वयक श्री. आनंद काटोले यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. तसेच प्रकल्प प्रस्तावकाचे प्रतिनिधी यांनी सर्वांचे आभार मानले, माननीय अध्यक्षा यांचे परवानगीने ही जाहिर लोकसुनावणी संपली असे जाहिर करण्यात आले.

| | | |
|---|---|---|
| **(आनंद काटोले)**<br>**उप-प्रादेशिक अधिकारी-२, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व समन्वयक, लोक सुनावणी समिती** | **(अशोक करे)**<br>**प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, नागपूर व सदस्य, लोक सुनावणी समिती** | **(अर्चना मोरे)**<br>**निवासी जिल्हाधिकारी तथा अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, वर्धा व अध्यक्षा, लोक सुनावणी समिती** |